**वादीचा सा. क्र. ३ यांचा उलटतपास प्रतिवादीचे वकील श्री. ए. एच. करवडे वकीलांमार्फत शपथेवर सुरुः—**

वादी व प्रतिवादीचे गट क्र. ५३७ व ५४२/१ यांची चतुर्सिमा लक्षात नाही. वादी व प्रतिवादी कोणत्या जमिनीच्या कब्जा व वहीवाटीत आहेत हे मला माहीत नाही. वादीचे मयत वडील यांना शासनाकडून कोणती जमिन मिळाली होती त्याचा गट नंबर माझ्या लक्षात नाही. वादीचे वडील किती तारखेला मरण पावले हे माझ्या लक्षात नाही. परंतु ते हृदयविकाराच्या झटक्याने मरण पावले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यांचे वडील अपघातात मरण पावले होते. हे मला माहीत नाही की वादी व प्रतिवादी यांचे आजपर्यंत हिस्सेबटवाडे झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की विनायक शहारे यांच्या मृत्युपर्यंत व त्यांच्या मृत्युनंतरही वादी व प्रतिवादी दोन्ही गटची वहीवाट करीत होते.

हे म्हणणे खरे आहे की वादी दिवाकर हे माझे खास नातेवाईक असून माझे साळेभाउ आहेत. हे मला माहीत नाही की तागडे अर्जनविसचे भाउ कलेक्टर आहेत. मी त्यांच्याबद्दल ऐकले आहे. मी तागडे अर्जनविसचा लायसन्स बघितला नाही. हे म्हणणे खरे नाही की तो बोगस अर्जनविस होता आणि रोडच्या लगत बसून काम करीत होता. हे म्हणणे खरे नाही की मी प्रत्यक्ष तहसिल ऑफीस येथे गेलो नव्हतो व माझ्या समोर कोणताही दस्त तयार करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी माझे साळेभाउ दिवाकर यांच्या सांगण्यावरुन तहसिल ऑफीसला गेलो व बनावटी कागदावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी दिवाकरचे वडील विनायक हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की विनायक शहारे यांनी त्यांच्या मर्जीने कोणताही दस्त तयार केला

नव्हता. हे मला माहीत नाही की विनायक शहारे यांना सदर जमिन त्याच्या कुटुंबाच्या भरणपोषणासाठी वनहक्क समिती मार्फत शासनाकडे पाठपुरावा करुन मिळालेली होती.

हे म्हणणे खरे नाही की विनायक व त्याची आई वेगळे राहत होते. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की ते दिवाकरकडेच राहत होते. हे म्हणणे खरे नाही की विनायक व त्याची आई सरुबाई चे भरणपोषण दिवाकरने कधीच केले नाही. हे म्हणणे खरे नाही की माझा साक्ष हलफनामा दिवाकरच्या सांगण्यानुसार लिहीण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की वादी दिवाकरच्या सांगण्यावरुन खोटे हलफनामे तयार करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण—**

**फेरतपास काही नाही—**

समक्ष,
श्रवणोत्तर स्विकृत

NEHA VIJAY SHAHU
Digitally signed by NEHA VIJAY SHAHU
Date: 2026.01.07 16:10:50 +0530

(एन.व्ही. साहू)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
अर्जुनी/मोरगांव

दि.०७—०१—२०२६